## आजचे पंचांग

दिनांक : ४ ऑगस्ट २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : षष्ठी तिथी (रात्री १०:०३ पर्यंत) त्यानंतर सप्तमी तिथी नक्षत्र : रेवती नक्षत्र (रात्री ०९:५३ पर्यंत) त्यानंतर अश्विनी नक्षत्र योग : धृति योग (रात्री ०७:३२ पर्यंत) त्यानंतर शूल योग करण : गराजा करण (सकाळी १०:३२ पर्यंत) त्यानंतर वाणीजा करण

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मानवी विचारशक्ती जपणे

**पुणे :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मानवी विचारशक्ती जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योगपती डॉ. गणेश नटराजन यांनी केले. सिंबायोसिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि सिंबायोसिस स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या संयुक्त नवागत विद्यार्थी स्वागत समारंभ व वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. नटराजन म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणे आवश्यक आहे, कारण तिचा वापर न करणारा माणूस आदिमानवासारखा आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### पंतप्रधान अन् गृहमंत्री हरवले : मोदी-शहांना पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नाही, ते संसदेत यायला घाबरतात का?, संजय राऊतांचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

आम्ही सर्वांनी ठरवले आहे की देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री हरवले आहेत अशी जाहिरात द्यायची.संसदेचे अधिवेशन सुरू होऊन दोन आठवडे उलटले तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा सभागृहात उपस्थित राहिले नसल्याचा आरोप करत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. पंतप्रधान आणि गृहमंत्री सभागृहात येण्यास घाबरत आहेत का? जर संसद चालवायचीच नव्हती, तर संसदेची नवीन इमारत कशासाठी उभारली? त्यांनी सोशल मीडियावरच संसद चालवावी, असा खोचक सवाल राऊतांनी केला आहे. संजय राऊत म्हणाले की, संसदेचे कामकाज सुरू असताना देशाचे प्रमुख नेते सभागृहात अनुपस्थित राहत असतील, तर त्यांना पदावर राहण्याचा नैतिक अधिकार उरतो का? या गोष्टीचा विचार भाजपच्या खासदारांनी केला पाहिजे. आम्ही आज सभागृहात गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरणार असल्याचे सांगत, लोकांसमोर जाण्यास आणि प्रश्नांना तोंड देण्यास सरकार का घाबरत आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**चोऱ्या-धमक्या देऊन मिळालेली सत्ता त्रास देतेय**

संजय राऊत म्हणाले की, चोऱ्या, मारामाऱ्या आणि धमकावून तुम्ही निवडणुका जिंकल्या आहेत. त्यामुळेच आता जनतेला तोंड देणे तुम्हाला कठीण जात आहे आणि तीच गोष्ट तुम्हाला त्रास देत आहे.

**संघ संविधान मानत नाही**

संजय राऊत म्हणाले की, रा.स्व.संघाचा इतिहास पाहिला तर ते संविधानाला आणि तिरंग्याला मानत नाहीत. त्यांनी ५२ वर्षे आपल्या कार्यालयावर तिरंगा फडकवला नाही. त्यांना स्वतंत्र संविधान निर्माण करायचे आहे. त्यासाठी ८५० खासदारांचे बळ निर्माण करत संविधान संपवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. तरुणांचे आंदोलन संविधान विरोधी आहे हे म्हणणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा अपमान आहे.

# 'लिव्ह-इन' नात्यांनाही कायद्याचे संरक्षण! सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

## बदलणार भारतीय नातेसंबंधांचे भविष्य?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

भारतातील बदलत्या सामाजिक वास्तवाला सर्वोच्च न्यायालयाने मोठी कायदेशीर मान्यता दिली आहे. विवाहासारख्या स्वरूपाचे 'लिव्ह-इन रिलेशनशिप' असलेल्या महिलांनाही भारतीय दंड संहितेच्या (खझउ) कलम ४९८-अ अंतर्गत संरक्षण मिळू शकते, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे अशा नात्यातील महिलांवर होणाऱ्या मानसिक किंवा शारीरिक क्रूरतेविरुद्ध आता फौजदारी कारवाईचा मार्ग खुला झाला आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, विवाहासारखे स्वरूप असलेले आणि विवाह करण्याचा स्पष्ट हेतू असलेले लिव्ह-इन संबंध हे केवळ सहजीवन नसून जबाबदारीचे नाते मानले जाईल. अशा नात्यातील महिलांना केवळ विवाह नोंदणीकृत नसल्यामुळे कायद्याच्या संरक्षणापासून वंचित ठेवणे हे भेदभावपूर्ण ठरेल.

आजच्या भारतात शिक्षण, रोजगार आणि शहरीकरणामुळे लिव्ह-इन संबंधांची संख्या वाढत आहे. मात्र अशा नात्यांमध्ये महिलांना अनेकदा शोषण, अत्याचार, आर्थिक फसवणूक आणि मानसिक छळाला सामोरे जावे लागत होते. विवाह नसल्याचे कारण देत अनेक आरोपी कायदेशीर जबाबदारीपासून बचाव करण्याचा प्रयत्न करत होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे अशा महिलांना न्याय मिळविण्याचा महत्त्वाचा मार्ग उपलब्ध झाला आहे.



तथापि, न्यायालयाने एक महत्त्वाची अटही स्पष्ट केली आहे. प्रत्येक लिव्ह-इन संबंधाला हा निर्णय लागू होणार नाही. फक्त विवाहासारखे स्वरूप असलेले, दीर्घकालीन, स्थिर आणि विवाह करण्याचा स्पष्ट हेतू असलेले संबंधच विवाहाच्या स्वरूपाचे नाते मानले जातील. त्यामुळे केवळ अल्पकालीन किंवा अनौपचारिक सहजीवनाला या निर्णयाचा लाभ मिळणार नाही.

हा निर्णय भारतीय समाजात सुरू असलेल्या सामाजिक परिवर्तनाचेही प्रतीक मानला जात आहे. कायदा आता केवळ पारंपरिक विवाहसंस्थेकडे पाहत नाही, तर वास्तवात अस्तित्वात असलेल्या नात्यांतील जबाबदाऱ्या आणि व्यक्तींचे मूलभूत हक्क यांनाही महत्त्व देत आहे. याचवेळी या निर्णयामुळे काही नवे प्रश्नही निर्माण झाले आहेत. विवाहाच्या स्वरूपाचे नाते नेमके कसे ठरवले जाईल? पुरावे कोणते असतील? कायद्याचा गैरवापर टाळण्यासाठी कोणती निकष लागू होतील? या सर्व बाबींची कसून तपासणी न्यायालयांना प्रत्येक प्रकरणात करावी लागणार आहे.

मात्र एक गोष्ट निर्विवाद आहेभारतीय न्यायव्यवस्थेने बदलत्या सामाजिक वास्तवाला स्वीकारत महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि समानतेला प्राधान्य दिले आहे. हा निर्णय केवळ लिव्ह-इन संबंधांबाबतचा कायदेशीर बदल नाही; तर प्रत्येक जबाबदार नात्यातील व्यक्तीला कायद्यापुढे समान संरक्षण मिळाले पाहिजे, हा घटनात्मक संदेश देणारा ऐतिहासिक टप्पा आहे..

## आदित्य ठाकरे यांच्या अडचणी वाढणार? दिशा सालियन मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाचे कठोर प्रश्न; नव्या चौकशीची शक्यता बळावली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या तीक्ष्ण निरीक्षणांमुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, न्यायालयाने अद्याप कोणताही दोषारोप किंवा निष्कर्ष नोंदवलेला नाही.

दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी मुलीवर सामूहिक बलात्कार करून हत्या झाल्याचा आरोप करत सीबीआय चौकशी आणि आदित्य ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर नोंदविण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने मुंबई पोलिसांना थेट विचारले, मृत्यूबाबत वडिलांनी संशय व्यक्त केल्यानंतर एफआयआर नोंदविण्यात नेमका अडथळा काय होता?

न्यायालयाने शवविच्छेदन अहवालावरही प्रश्न उपस्थित करत, १४व्या मजल्यावरून पडलेल्या व्यक्तीच्या शरीरावर गंभीर दुखापती कशा दिसत नाहीत? असा सवाल केला. तसेच, एफआयआर नसल्याचे सांगत असताना अपघाती मृत्यू नोंदीसारखी कागदपत्रे याचिकाकर्त्यांना देण्यात पोलिसांना अडचण काय आहे, याबाबतही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.



दुसरीकडे, मुंबई पोलिसांनी न्यायालयात भूमिका मांडताना दोन स्वतंत्र चौकशीत हा मृत्यू आत्महत्येचाच असल्याचे निष्कर्ष समोर आल्याचा दावा केला आहे.

या प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्याविरोधातील आरोप अद्याप न्यायालयात सिद्ध झालेले नाहीत आणि न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध कोणतेही प्रतिकूल निरीक्षण केलेले नाही. मात्र, न्यायालयाने उपस्थित केलेले प्रश्न आणि पुढील सुनावणीमुळे या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

२४ ऑगस्ट रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, या प्रकरणातील पुढील न्यायालयीन घडामोडी राजकीय आणि कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाच्या ठरणार आहेत.

## जमीन संपादन प्रकरणांतील अपील महागणार! सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । विशेष प्रतिनिधी

जमीन संपादनाशी संबंधित प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत स्पष्ट केले आहे की, जमीन संपादन भरपाईतील वैधानिक लाभ (Statutory Benefits) कमी करण्यासाठी किंवा वगळण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या अपीलावर 'ॲड व्हॅलोरेम' (दाव्याच्या रकमेच्या प्रमाणात) न्यायालयीन शुल्क भरावे लागेल. केवळ निश्चित (Fixed) कोर्ट फी भरून असे अपील करता येणार नाही.

न्यायमूर्ती आर. महादेवन आणि मनमोहन यांच्या खंडपीठाने उत्तराखंड उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत हा निकाल दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, जमीन संपादन कायदा, १८९४ च्या कलम ५४ अंतर्गत दाखल होणारे असे अपील हे भरपाईशी संबंधित न्यायालयीन डिक्रीविरुद्धचे अपील मानले जाईल. त्यामुळे कोर्ट फी कायदा, १८७० मधील कलम ८ नुसार त्यावर दाव्याच्या रकमेच्या प्रमाणात न्यायालयीन शुल्क आकारणे बंधनकारक आहे.

या निर्णयामुळे जमीन संपादनाशी संबंधित अपील दाखल करणाऱ्या पक्षकारांना न्यायालयीन शुल्काबाबत अधिक काळजी घ्यावी लागणार आहे. चुकीची किंवा अपुरी कोर्ट फी भरल्यास अपील ग्राह्य धरण्यात अडचणी येऊ शकतात.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय भविष्यातील जमीन संपादन प्रकरणांसाठी महत्त्वाचा मार्गदर्शक ठरणार असून, न्यायालयीन शुल्काबाबतचा कायदेशीर संभ्रमही दूर करणार आहे.

## फक्त करार पुरेसा नाही! मुद्रांक शुल्काशिवाय ताबा दिलेल्या विक्री कराराला न्यायालयात मान्यता नाही

### आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष वृत्त

मालमत्तेच्या व्यवहारांमध्ये निष्काळजीपणा महागात पडू शकतो, असा महत्त्वाचा इशारा आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. ज्या विक्री करारामध्ये (ड्रश्रश असऑशशाशपीं) मालमत्तेचा ताबा देण्यात आल्याचा स्पष्ट उल्लेख आहे, त्या करारावर आवश्यक मुद्रांक शुल्क आणि दंड भरल्याशिवाय तो न्यायालयात पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही, असा निर्णय न्यायालयाने दिला आहे.

न्यायमूर्ती वेंकटेश्वरलू निम्मगड्डा यांनी खालच्या न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत




स्पष्ट केले की, दस्तऐवजाचे कायदेशीर मूल्य हे त्यातील मजकूर आणि अटींवर ठरते; पक्षकारांनी नंतर केलेल्या दाव्यांवर नाही. त्यामुळे ताबा हस्तांतरित झाल्याची नोंद असलेला करार अपुऱ्या मुद्रांक शुल्कासह न्यायालयात सादर करता येणार नाही. या निर्णयामुळे मालमत्ता खरेदी-विक्री करणाऱ्या नागरिकांना मोठा धडा मिळाला आहे. अनेक व्यवहार नोंदणी आणि मुद्रांक शुल्क टाळण्यासाठी केवळ करारावर केले जातात. मात्र भविष्यात वाद निर्माण झाल्यास अशा अपूर्ण कागदपत्रांमुळे न्यायालयीन लढाईत मोठे नुकसान होऊ शकते. उच्च न्यायालयाचा हा निर्णय स्पष्ट संदेश देतोमालमत्तेचा व्यवहार करताना कायदेशीर प्रक्रिया, मुद्रांक शुल्क आणि नोंदणी यांना पर्याय नाही. काही हजार रुपये वाचविण्याचा प्रयत्न भविष्यात लाखो रुपयांचे नुकसान आणि न्यायालयीन अडचणी निर्माण करू शकतो.

## मोठी बातमी! शरद पवारांनी 'भाकरी फिरवली'; राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक आघाडीला नवा सेनापती, नव्या नेतृत्वाला संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष वृत्त

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या युवक संघटनेत मोठा बदल करत पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी नव्या नेतृत्वाला संधी दिली आहे. युवक संघटनेच्या नेतृत्वात फेरबदल करत नव्या अध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली असून, पक्ष संघटना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.

पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला गती देण्यासाठी आणि युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशाने हा बदल करण्यात आल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि इतर राजकीय आव्हाने लक्षात घेऊन युवक संघटनेत नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची रणनीती पक्षाने स्वीकारल्याचे बोलले जात आहे.

शरद पवार यांनी वेळोवेळी संघटनेत बदल करून नव्या कार्यकर्त्यांना जबाबदारी देण्याची परंपरा कायम ठेवली आहे. त्याचाच भाग म्हणून युवक संघटनेच्या नेतृत्वात हा बदल करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक संघटनेच्या कामकाजाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नव्या नेतृत्वासमोर संघटन विस्तार, युवकांना पक्षाशी जोडणे आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची ताकद वाढवण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

दरम्यान, या बदलामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुढील संघटनात्मक हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचा फार्मसी व्यवस्थेवर मोठा सवाल! औषधांच्या सुरक्षिततेशी तडजोड की आता आमूलाग्र बदलाची वेळ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

देशातील प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या औषध क्षेत्रावर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत गंभीर निरीक्षण नोंदवले आहे. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (झउख) ही संस्था सध्याच्या स्वरूपात पुढे सुरू राहू नये, असे स्पष्ट मत व्यक्त करत न्यायालयाने केंद्र सरकारला प्रश्न केला आहे की, राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (छरींळेपरश्र चशवळलरश्र उेााळीळेप - छचउ) प्रमाणे फार्मसी क्षेत्रासाठी स्वतंत्र आणि आधुनिक वैधानिक आयोग का स्थापन केला जाऊ नये?

हा केवळ न्यायालयीन प्रश्न नाही, तर देशातील औषध व्यवस्था, फार्मसी शिक्षण आणि रुग्णांच्या सुरक्षिततेबाबत दिलेला गंभीर इशारा आहे. भारताला जगाची फार्मसी म्हणून ओळख मिळाली आहे. जगातील अनेक देशांना भारतातून औषधांचा पुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत औषध क्षेत्राचे नियमन करणारी संस्था सक्षम, पारदर्शक आणि आधुनिक असणे ही काळाची गरज आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान अनेक फार्मसी महाविद्यालयांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. अनेक ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा, प्रयोगईएमआया, प्रशिक्षित शिक्षक आणि दर्जेदार शिक्षणाचा अभाव असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अशा परिस्थितीत तयार होणारे फार्मासिस्ट भविष्यात रुग्णांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात, अशी भीतीही न्यायालयाने व्यक्त केली.

न्यायालयाने हेही नमूद केले की, कालबाह्य झालेल्या व्यवस्थेमुळे सुधारणा अडखळत आहेत. वैद्यकीय शिक्षणासाठी मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या जागी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाची स्थापना करण्यात आली. त्याच धर्तीवर फार्मसी क्षेत्रातही व्यापक बदलांची आवश्यकता असल्याचे संकेत सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

केंद्र सरकारने न्यायालयाला माहिती दिली की, नॅशनल फार्मसी कमिशन विधेयक तयार करण्याचे काम सुरू असून, त्याद्वारे १९४८ च्या फार्मसी कायद्याऐवजी आधुनिक आणि अधिक उत्तरदायी व्यवस्था उभारण्याचा विचार आहे.

या घडामोडींचा सर्वाधिक परिणाम लाखो फार्मसी विद्यार्थ्यांवर, त्यांच्या पालकांवर आणि देशातील औषध उद्योगावर होणार आहे. महाविद्यालयांच्या मान्यतेवरील वाद, प्रवेश प्रक्रियेतील अनिश्चितता आणि शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत निर्माण झालेले प्रश्न विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी थेट संबंधित आहेत.

भारतीय औषध उद्योगाने जगभरात विश्वास संपादन केला आहे. मात्र हा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी केवळ औषध उत्पादन पुरेसे नाही; त्या मागे दर्जेदार शिक्षण, सक्षम नियमन, पारदर्शक व्यवस्था आणि कठोर गुणवत्ता नियंत्रण आवश्यक आहे. त्यामुळे फार्मसी क्षेत्रात होणाऱ्या सुधारणांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणामुळे आता एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहेभारताची औषध व्यवस्था भविष्यात अधिक सक्षम, पारदर्शक आणि रुग्णकेंद्रित होणार का, की सुधारणा पुन्हा एकदा कागदावरच राहणार? देशातील प्रत्येक नागरिक सुरक्षित औषधांवर विश्वास ठेवतो. त्या विश्वासाचे रक्षण करण्याची जबाबदारी केवळ सरकारची किंवा नियामक संस्थांची नसून संपूर्ण व्यवस्थेची आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा इशारा केवळ एका संस्थेसाठी नाही, तर भारताच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि जबाबदार बनविण्याची संधी आहे.

## संपादकीय

### ईएमआय पुन्हा वाढणार? आरबीआय च्या निर्णयाकडे देशाचे लक्ष; तुमच्या खिशावर नेमका काय परिणाम होणार?

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) पतधोरण समितीची (Monetary Policy Committee - MPC) ऑगस्ट २०२६ मधील तीन दिवसांची बैठक ३ ऑगस्टपासून सुरू झाली असून, ५ ऑगस्ट रोजी गव्हर्नर संजय मल्होत्रा अंतिम निर्णय जाहीर करणार आहेत. हा निर्णय केवळ बँकिंग क्षेत्रापुरता मर्यादित नसून देशातील गृहकर्जधारक, वाहन कर्ज घेणारे, उद्योग, गुंतवणूकदार आणि बचतदार अशा सर्वांवर त्याचा थेट परिणाम होणार आहे.

आरबीआय चे प्रमुख उद्दिष्ट महागाई नियंत्रणात ठेवणे, आर्थिक विकासाला चालना देणे आणि देशातील वित्तीय स्थैर्य टिकवणे हे आहे. यासाठी दर दोन महिन्यांनी चझउ बैठक घेऊन रेपो दरासह महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले जातात. या समितीत सहा सदस्य असतात. त्यापैकी तीन सदस्य आरबीआय चे आणि तीन सदस्य केंद्र सरकारकडून नियुक्त केलेले असतात. बहुमताच्या आधारे व्याजदर निश्चित केला जातो.

**रेपो दर म्हणजे काय?**

रेपो दर म्हणजे आरबीआय व्यावसायिक बँकांना अल्पकालीन निधी ज्या व्याजदराने उपलब्ध करून देते तो दर. सध्या हा दर ५.२५ टक्के आहे. रेपो दर वाढल्यास बँकांचा निधी महाग होतो आणि त्याचा परिणाम गृहकर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज आणि व्यावसायिक कर्जाच्या व्याजदरांवर होतो. परिणामी कर्जदारांच्या ईएमआय वाढू शकतात. उलट रेपो दर कमी झाल्यास कर्जावरील व्याज कमी होण्याची शक्यता निर्माण होते.

**यावेळी काय अपेक्षा?**

बहुतेक अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे की आरबीआय यावेळी रेपो दरात तातडीने बदल न करता तो कायम ठेवू शकते. मात्र बाजाराचे लक्ष केवळ व्याजदरावर नसून आरबीआय च्या धोरणात्मक भूमिकेकडे आहे. महागाई, जागतिक आर्थिक परिस्थिती आणि आगामी काळातील संकेत यावरून पुढील काही महिन्यांत व्याजदर वाढतील की कमी होतील, याचा अंदाज घेतला जाईल.

**आरबीआय समोरची मोठी आव्हाने**

सध्या आरबीआय ला महागाई नियंत्रणात ठेवतानाच आर्थिक विकासालाही गती देण्याचे दुहेरी आव्हान आहे. व्याजदर वाढल्यास उद्योगांसाठी कर्ज महाग होते, गुंतवणूक कमी होऊ शकते आणि रोजगार निर्मितीवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे व्याजदर खूप कमी ठेवल्यास बाजारात पैशांचा पुरवठा वाढून महागाई वाढण्याचा धोका असतो.

याशिवाय जागतिक परिस्थितीही भारतासाठी महत्त्वाची ठरत आहे. कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार, भूराजकीय तणाव आणि जागतिक आर्थिक अनिश्चितता यामुळे आयात खर्च वाढू शकतो. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के तेल आयात करतो. त्यामुळे तेल महाग झाल्यास वाहतूक, उत्पादन खर्च आणि अखेरीस महागाईवर परिणाम होतो.

**ईएमआय वर किती परिणाम?**

समजा एखाद्या व्यक्तीने ५० लाख रुपयांचे गृहकर्ज २० वर्षांसाठी घेतले आहे. अशा परिस्थितीत व्याजदरात ०.२५ टक्क्यांची वाढ झाली तर मासिक ईएमआय काहीशे रुपयांनी वाढू शकते. संपूर्ण कर्जाच्या कालावधीत ही वाढ लाखो रुपयांच्या अतिरिक्त व्याजामध्ये रूपांतरित होऊ शकते. त्यामुळे रेपो दरातील अगदी छोटा बदलही कर्जदारांच्या मासिक अर्थसंकल्पावर परिणाम करतो.

**बचतदारांनाही परिणाम**

व्याजदर वाढल्यास अनेक बँका मुदतठेवींवर (FD) अधिक व्याज देण्याची शक्यता असते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, निवृत्त व्यक्ती आणि नियमित बचत करणाऱ्यांना फायदा होऊ शकतो. मात्र याच वेळी कर्जदारांवरील आर्थिक भार वाढतो. त्यामुळे आरबीआय चा प्रत्येक निर्णय वेगवेगळ्या घटकांवर वेगवेगळा परिणाम घडवतो.

**शेअर बाजाराची नजर**

आरबीआय च्या निर्णयाकडे शेअर बाजाराचेही बारकाईने लक्ष असते. व्याजदर वाढल्यास रिअल इस्टेट, वाहन आणि कर्जावर अवलंबून असलेल्या क्षेत्रांवर दबाव येऊ शकतो. तर व्याजदर स्थिर राहिल्यास किंवा भविष्यासाठी सकारात्मक संकेत मिळाल्यास गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढण्याची शक्यता असते.

**नागरिकांनी काय करावे?**

ज्यांचे कर्ज फ्लोटिंग व्याजदरावर आहे त्यांनी बँकेकडून व्याजदरातील बदलांची माहिती नियमित घ्यावी. शक्य असल्यास अतिरिक्त रक्कम भरून मूळ कर्ज कमी करण्याचा विचार करावा. बचतदारांनी नवीन ऋ करण्यापूर्वी विविध बँकांचे व्याजदर तपासावेत. कोणताही आर्थिक निर्णय अफवांवर नव्हे, तर आरबीआय च्या अधिकृत घोषणेनंतरच घ्यावा.

५ ऑगस्ट रोजी जाहीर होणारा आरबीआय चा निर्णय हा केवळ एका व्याजदराचा निर्णय नसेल. तो देशातील कर्जदार, बचतदार, उद्योग, गुंतवणूकदार आणि एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगामी दिशेचा महत्त्वाचा संकेत ठरणार आहे. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष आता आरबीआय च्या घोषणेकडे लागले आहे.

## रुग्णसेवेचा आढावा घेण्यासाठी सभापती अभिषेक बारणे 'ऑनफिल्ड'; शंकरराव मासूळकर नेत्र रुग्णालयाची पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी सोमवारी पिंपरीतील शंकरराव मासूळकर नेत्र रुग्णालयाला भेट देत रुग्णसेवेचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

यावेळी त्यांनी रुग्णालयातील वैद्यकीय सेवा, आधुनिक सुविधा, स्वच्छता आणि एकूणच कामकाजाची पाहणी केली. उपचारासाठी आलेल्या रुग्णांशी थेट संवाद साधून त्यांना मिळणाऱ्या सेवा, उपचारांची गुणवत्ता, डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे सहकार्य, प्रतीक्षा कालावधी आणि अन्य सुविधांबाबत अभिप्राय जाणून घेतला.

रुग्णांकडून मिळालेल्या सूचना आणि अपेक्षा लक्षात घेऊन डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण व वेळेत आरोग्यसेवा देण्याच्या सूचना बारणे यांनी दिल्या. भविष्यात रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेता आवश्यक मनुष्यबळ, अत्याधुनिक वैद्यकीय



उपकरणे आणि सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध पावले उचलावीत, असे निर्देशही त्यांनी दिले.

शंकरराव मासूळकर नेत्र रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध नेत्रोपचार सेवा, शस्त्रक्रिया सुविधा आणि शासकीय योजनांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावी, यासाठी महापालिकेने व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

या पाहणी दौऱ्यात सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, नेत्ररोग विभागाच्या प्रमुख डॉ. रूपाली महेशगौरी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत नागरिकांना अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि रुग्णकेंद्रित आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन अभिषेक बारणे यांनी यावेळी केले.

## पिंपरी-चिंचवड विकास आराखड्याला वेग; सभापती अभिषेक बारणे यांच्या नेतृत्वात सुनावणी प्रक्रिया सुरू!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या (PCMC) आगामी २० वर्षांतील विकासाची दिशा आणि चेहरामोहरा ठरवणारा सुधारित प्रारूप विकास आराखडा अंतिम मंजुरीसाठी सज्ज होत आहे. या आराखड्यावर नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सुमारे ५६,७७१ हरकती आणि सूचनांवर प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष नियोजन समितीचे नेतृत्व स्थायी समितीचे अध्यक्ष तथा सभापती अभिषेक बारणे करत आहेत. लोकसहभागातून शहराचे 'व्हिजन २०४१'समितीची स्थापना होताच मागील काही महिन्यांपासून प्रलंबित असलेली सुनावणी प्रक्रिया अत्यंत वेगाने मार्गी लावली जात आहे. ''विकास आराखडा हा केवळ एक शासकीय दस्तऐवज नसून ते जनतेच्या हिताचे माध्यम आहे. लोकसहभागातून आणि पारदर्शक पद्धतीनेच पिंपरी-चिंचवडच्या उज्ज्वल भविष्याचा अंतिम नकाशा (रोडमॅप) तयार केला जाईल,''



असा ठाम विश्वास सभापती अभिषेक बारणे यांनी व्यक्त केला आहे.आकुर्डीत विशेष सुनावणी कक्षनागरिकांना त्यांचे म्हणणे मांडता यावे यासाठी आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात विशेष सुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रक्रियेसाठी नगररचना विभागातील तज्ज्ञ आणि अधिकाऱ्यांचा समावेश असलेली सात सदस्यीय समिती अहोरात्र काम करत आहे.१५ डिसेंबरपर्यंत अंतिम आराखडा शासनाकडे पाठवणारनिवडणूक आचारसंहितेमुळे रखडलेल्या या प्रक्रियेला आता ६ महिन्यांची मुदतवाढ मिळाली असून, १५ डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व हरकतींवरील सुनावणी पूर्ण करून हा अंतिम आराखडा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे. सभापती अभिषेक बारणे यांच्या गतिमान आणि सुनियोजित नेतृत्वामुळे पिंपरी-चिंचवड आता खऱ्या अर्थाने एक 'सुंदर आणि नियोजित शहर' बनण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहे.

## क्रांतिसिंह नाना पाटील यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक, 'प्रती सरकार'चे शिल्पकार आणि शेतकरी-कष्टकरी जनतेच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत अभिवादन करण्यात आले. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील अतुलनीय योगदानाचे स्मरण केले. ब्रिटिश सत्तेविरोधात निर्भयपणे उभे राहत त्यांनी जनतेच्या सहभागातून 'प्रती सरकार'ची स्थापना करून स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकारली. शेतकरी, कष्टकरी आणि वंचित समाजघटकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी दिलेला संघर्ष भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणादायी अध्याय असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

राष्ट्रप्रेम, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्ये आणि जनकल्याण यांना सर्वोच्च प्राधान्य देत नाना पाटील यांनी आयुष्यभर समाजहितासाठी कार्य केले. त्याग, संघर्ष आणि निःस्वार्थ समाजसेवेचा त्यांचा आदर्श आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या विचारांतून राष्ट्रसेवा आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा कायम मिळत राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीचा 'डिजिटल' कारभार संकटात; कोट्यवधींच्या खर्चानंतरही कॅमेरे आणि ऑनलाईन प्रणाली निष्क्रिय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीने शहरात बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे अत्यंत निकृष्ट दर्जाचे किंवा कालबाह्य झाल्याचे समोर आले आहे. यामुळे कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही शहरातील मुख्य सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे कोलमडली असून, स्थानिक नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींनी यावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.=त्र मुख्य मुद्दे आणि ठळक घडामोडी:५ हजारांहून अधिक कॅमेरे बंद: शहरात एकूण ८,७९० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले होते. त्यापैकी तब्बल ५,४६३ कॅमेरे सध्या बंद अवस्थेत आहेत. केवळ ३,३२७ कॅमेरे प्रत्यक्षात सुरू आहेत.कोट्यवधी रुपयांचा अपव्यय: या प्रकल्पासाठी तब्बल ११२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. मात्र, योग्य





देखभाल-दुरुस्ती अभावी आणि तांत्रिक बिघाडामुळे हा संपूर्ण खर्च वाया गेल्याचा आरोप होत आहे. सुरक्षेशी खेळ व चोऱ्या: अनेक ठिकाणचे कॅमेरे बंद असून, काही ठिकाणच्या कॅमेऱ्यांच्या महागड्या बॅटऱ्या चोरीला गेल्या आहेत. यामुळे पोलिसांना गुन्ह्यांचा तपास करताना अडचणी येत आहेत.ई-ऑफिस प्रणालीही ठप्प: महापालिकेच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी सुरू केलेली 'ई-ऑफिस' प्रणाली वारंवार बंद पडत असल्याने प्रशासकीय कामकाजात मोठा अडथळा निर्माण होत आहे.= ठेकेदारांवर कडक कारवाईची मागणीस्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांनी यावर समाधानकारक उत्तर दिले नसल्याने लोकप्रतिनिधींचा संताप आणखी वाढला आहे. संबंधित ठेकेदार कंपनी 'टेक महिंद्रा' आणि सल्लागारांवर तातडीने दंडात्मक कारवाई करावी, तसेच झालेला खर्च त्यांच्याकडून वसूल करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, अशी जोरदार मागणी आता केली जात आहे.

## डिंभे धरणातून २० हजार १०० क्युसेक्स विसर्ग; घोडनदीला पूर, शेतीचे मोठे नुकसान, बेल्हा-जेजुरी महामार्गावरील वाहतूक ठप्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डिंभे धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढला असून, सोमवारी दुपारनंतर धरणातून २० हजार १०० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यामुळे घोडनदीला मोठा पूर आला असून नदीकाठावरील गावांतील शेती पाण्याखाली गेली आहे. तसेच लाखणगाव येथील बेल्हा-जेजुरी महामार्गावरील पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

धरण क्षेत्रात अद्यापही मुसळधार पाऊस सुरू असून डिंभे धरणातील पाणीसाठा ९८ टक्क्यांहून अधिक झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून सोमवारी सकाळपासून धरणाच्या पाचव्या दरवाजातून पाणी सोडण्यास सुरुवात



करण्यात आली. दुपारनंतर विसर्ग वाढविण्यात आल्याने घोडनदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली.

पूराच्या पाण्यामुळे डिंभे, शिनोली, गंगापूर, वडगाव, कळंब, पिंपळगाव, चांडोली, निरगुडसर, पारगाव, काठापूर बुद्रुक, देवगाव आणि लाखणगाव परिसरातील नदीकाठच्या शेतांमध्ये पाणी शिरले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून नदीकाठावरील शेतीपंपही पाण्याखाली गेले आहेत.

दरम्यान, लाखणगाव येथील बेल्हा-जेजुरी महामार्गावरील पूल सोमवारी सकाळी आठ वाजल्यापासून पाण्याखाली गेल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. नाशिक, नगर, सोलापूर, सातारा आणि कोल्हापूरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी हा महत्त्वाचा मार्ग असल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे, पूरग्रस्त भागात जाणे टाळावे तसेच पुलावरून पाणी वाहत असताना कोणत्याही परिस्थितीत पूल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

धरण क्षेत्रात पावसाचा जोर कायम असल्याने पुढील काही तासांत विसर्गात बदल होण्याची शक्यता असून, नदीकाठच्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## प्रभाग २१ मधील गुणवंतांचा भव्य सत्कार; २२०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

श्री संदीप वाघेरे युवा मंचच्या वतीने प्रभाग क्रमांक २१ मधील इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी ज्युनिअर केजी ते इयत्ता आठवीपर्यंतच्या सुमारे २२०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी डॉ. गणेश शिंदे, स्थायी समिती सदस्या सुलभा उबाळे, नगरसेविका निकिता कदम, प्रियांका कुदळे, नगरसेवक विकास साने, माजी नगरसेवक श्रीरंग शिंदे, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत घुले, ज्ञानोबा गव्हाणे, सुधाकर यादव, उत्तम कुदळे, शांताराम सातव, रवींद्र वाघेरे, सतीश वाघेरे आणि प्रविण कुदळे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गणेश शिंदे यांनी यशासाठी सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त, वेळेचे नियोजन आणि सकारात्मक विचार आवश्यक असल्याचे सांगितले. शिक्षण हे व्यक्तिमत्त्व घडविणारे प्रभावी माध्यम असून, स्पर्धेच्या युगात केवळ गुण नव्हे तर कौशल्य, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकीही तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. नगरसेवक संदीप वाघेरे यांनी प्रभागातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. गुणवंतांचा गौरव करण्याबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात इयत्ता दहावीतील दिया संतोष रतनानी, गौरी राहुल अडपवार आणि श्वेता शरद पाचनकर, तसेच बारावीतील लाविना प्रकाश कटारिया, श्रीर्षा श्रीपाद कुलकर्णी आणि यश राम मदने या गुणवंत विद्यार्थ्यांचा लॅपटॉप व टॅब देऊन विशेष सत्कार करण्यात आला. इतर गुणवंत विद्यार्थ्यांनाही स्कूल बॅग देऊन गौरविण्यात आले. याच कार्यक्रमात ज्युनिअर केजी ते इयत्ता आठवीपर्यंतच्या सुमारे २२०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाबद्दल विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त करत युवा मंचाच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल कातळे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन युवा मंचचे अध्यक्ष हरीष वाघेरे, किरण शिंदे, जितेंद्र वाटकर, रंजना जाधव आणि श्रद्धा देडे यांनी केले, तर शेवटी शेखर अहिरराव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### जुन्नरमधील YCM हॉस्पिटलच्या हलगर्जीपणामुळे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याचा रुग्णाचा आरोप; प्रशासनाचे स्पष्टीकरण अद्याप नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

जुन्नर । प्रतिनिधी

जुन्नर येथील यशवंतराव चव्हाण मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल (YCM) मधील उपचारादरम्यान हलगर्जीपणा झाल्यामुळे आपले आयुष्य उद्ध्वस्त झाल्याचा गंभीर आरोप रुग्ण अक्षय काळे यांनी केला आहे. तसेच रुग्णालयातील डॉक्टर आणि प्रशासनावर निष्काळजीपणा व आर्थिक गैरव्यवहारासंदर्भातही त्यांनी आरोप केले आहेत.

अक्षय काळे यांनी केलेल्या आरोपांनुसार, उपचार प्रक्रियेत गंभीर त्रुटी राहिल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागल्याचा दावा करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टर आणि रुग्णालय प्रशासनाची चौकशी करून योग्य कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

मात्र, हे आरोप सध्या एकतर्फी असून त्याबाबत रुग्णालय प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

या प्रकरणी यशवंतराव चव्हाण मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलकडून किंवा संबंधित डॉक्टरांकडून स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर त्यालाही समान प्रसिद्धी देण्यात येईल. तसेच या प्रकरणातील पुढील घडामोडींवर लक्ष ठेवून वृत्त अद्ययावत करण्यात येईल.

### दारुच्या नशेत पोलीस व्हॅन चालविणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याने चार वाहनांना दिली धडक; पोलीस हवालदाराला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

टिळक रोडवर सायंकाळच्या वेळी वाहतूक कोंडी झाली असताना दारुच्या नशेत पोलीस हवालदाराने पोलीस व्हॅन देशमुखवाडीतील गल्लीत घालून २ कार, पॅगो टेम्पो, एक दुचाकी अशा चार गाड्यांना धडक देऊन मोठे नुकसान केले. सुदैवाने गाडीत कोणी नसल्याने कोणी जखमी झाले नाही. हा अपघात टिळक रोडला लागून असलेल्या देशमुखवाडी येथे शुक्रवारी सायंकाळी सात वाजता घडला. विश्रामबाग पोलिसांनी या पोलीस हवालदारावर गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे. बाळासाहेब वसंत खैरे (वय ५२) असे या पोलीस हवालदाराचे नाव आहे.

# राखीव वनक्षेत्रात विनापरवाना चराई; वनविभागाची कारवाई, गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

जुन्नर वनविभागाने लोणी (ता. आंबेगाव) येथील राखीव वनक्षेत्रात विनापरवाना शेळ्या-मेंढ्यांची चराई करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करत भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत वनगुन्हा दाखल केला आहे.

उपवनसंरक्षक प्रशांत खाडे तथा सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले (मंचर) यांच्या नेतृत्वाखाली वनविभागाचे पथक लोणी येथील राखीव वनक्षेत्र (फॉरेस्ट कंपार्टमेंट क्र. २५८) मध्ये नियमित गस्त घालत होते. यावेळी दुपारच्या सुमारास राखीव वनक्षेत्रात विनापरवाना शेळ्या व मेंढ्यांची चराई सुरू असल्याचे निदर्शनास आले.



तपासादरम्यान बिरा गणेश शिगटे (रा. लोणी) यांनी कोणतीही वैध परवानगी न घेता राखीव वनक्षेत्रात गुरे चराईसाठी प्रवेश केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी संबंधिताविरुद्ध भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील कलम २६(१) (अ) अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला असून घटनास्थळाचा पंचनामा करून आवश्यक पुरावे संकलित करण्यात आले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई वनपाल निलम चव्हाण, वनपरिमंडळ अधिकारी धामणी, वनरक्षक लोणी, वनरक्षक धामणी तसेच लोणी ग्रामस्थ, पोलिस पाटील आणि सरपंच यांच्या सहकार्याने करण्यात आली. वेळेवर माहिती देऊन सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे वनविभागाने आभार मानले.

वनविभागाने नागरिकांना आवाहन केले असून, राखीव वनक्षेत्रात कोणत्याही प्रकारची विनापरवाना गुरे चराई करू नये. नियमांचे उल्लंघन आढळल्यास भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतुदीनुसार संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## शिरूरमध्ये कर्जाच्या आमिषाने महिलांची फसवणूक; नगरपरिषदेच्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यासह दोघींवर गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

शिरूर । प्रतिनिधी

कमी व्याजदरात कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून महिलांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी शिरूर नगरपरिषदेतील एका कंत्राटी महिला कर्मचाऱ्यासह दोन महिलांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलांनी विविध महिलांना सहज कर्ज उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी कागदपत्रे, प्रक्रिया शुल्क व इतर कारणे सांगून संबंधितांकडून पैसे उकळल्याचा आरोप आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणतेही कर्ज मंजूर न करता महिलांची फसवणूक करण्यात आल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल झाली.




तक्रारीनंतर शिरूर पोलिसांनी प्राथमिक चौकशी करून नगरपरिषदेच्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यासह दोन महिलांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून, आणखी पीडित महिलांची संख्या वाढण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

या घटनेमुळे शिरूर परिसरात खळबळ उडाली असून, कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली कोणालाही पैसे देण्यापूर्वी संबंधित संस्थेची आणि व्यक्तीची खातरजमा करण्याचे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

## पारगाव पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी; २.३४ लाखांचे १३ हरवलेले मोबाईल तक्रारदारांना परत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

हरवलेले मोबाईल शोधून नागरिकांना दिलासा देण्याच्या मोहिमेत पारगाव (कारखाना) पोलीस ठाण्याने उल्लेखनीय कामगिरी करत सुमारे २ लाख ३४ हजार रुपये किमतीचे १३ मोबाईल शोधून संबंधित तक्रारदारांच्या ताब्यात परत केले आहेत. ही माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी दिली.



हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलीस अंमलदार मंगेश अंभोरे आणि संजय साळवे यांनी सीईआयआर (CEIR) पोर्टल तसेच इतर तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर केला. तांत्रिक तपासातून मोबाईलचा माग काढल्यानंतर संबंधित धारकांशी संपर्क साधून त्यांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले.

यावेळी पोलिसांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, मोबाईल हरवल्यास वेळ न दवडता जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याची विशेष मोहीम पुढील काळातही सातत्याने राबविण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे, सन २०२५-२०२६ या कालावधीत पारगाव (कारखाना) पोलीस ठाण्याने आतापर्यंत एकूण ५० हरवलेले मोबाईल शोधून त्यांच्या मालकांना परत केले आहेत. नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करणारी ही कामगिरी असून पारगाव पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सावकारशाहीचा विळखा; तरुणाईला आर्थिक गुलामगिरीकडे ढकलणारे मूक संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

ओतूर : प्रतिनिधी

राज्य सरकार विविध स्वयंरोजगार आणि उद्योग प्रोत्साहन योजनांद्वे तरुणांना व्यवसायाकडे वळविण्याचा प्रयत्न करत असताना, ग्रामीण भागात मात्र बेकायदेशीर खासगी सावकारशाहीचे जाळे पुन्हा मजबूत होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. जुन्नर तालुक्यासह अनेक भागांत आर्थिक अडचणीत सापडलेले तरुण तातडीच्या पैशांच्या गरजेमुळे खासगी सावकारांकडे वळत असून, त्यातून मानसिक, आर्थिक आणि सामाजिक शोषणाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा आहे.

स्थानिक स्तरावर मिळणाऱ्या माहितीनुसार, बँकांच्या कर्ज प्रक्रियेला लागणारा वेळ, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि तातडीच्या आर्थिक गरजा यामुळे अनेक नवउद्योजक व युवक खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. सुरुवातीला मदतीसारखा वाटणारा हा व्यवहार पुढे अवाजवी व्याजदर, मानसिक छळ, धमक्या आणि आर्थिक दडपशाहीत बदलत असल्याचा आरोप केला जात आहे.



यामुळे अनेक कुटुंबे कर्जाच्या दुष्टचक्रात अडकत असून, कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज घेण्याची वेळ येत आहे. सामाजिक प्रतिष्ठा, कुटुंबाची अब्रू आणि जीवाच्या भीतीमुळे अनेक पीडित व्यक्ती तक्रार करण्यास धजावत नसल्याचेही बोलले जात आहे. काही घटनांमध्ये नैराश्य आणि आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतल्याच्या घटनांमुळे हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

दरम्यान, गावोगावी भिशी, खासगी आर्थिक व्यवहार किंवा इतर माध्यमांतून बेकायदेशीर सावकारी सुरू असल्याच्या चर्चाही रंगत आहेत. काही प्रभावशाली व्यक्ती अशा व्यवहारांमध्ये सहभागी असल्याचे आरोप होत असले, तरी त्याबाबत अधिकृतरीत्या कोणतीही पुष्टी झालेली नाही. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

तज्ज्ञांच्या मते, केवळ तक्रार दाखल होण्याची वाट न पाहता पोलिस, सहकार विभाग, महसूल प्रशासन आणि आर्थिक गुन्हे ईएमआयेने समन्वयाने गुप्त माहितीच्या आधारे बेकायदेशीर सावकारीचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच पीडितांना कायदेशीर संरक्षण, गोपनीयतेची हमी आणि तातडीची मदत उपलब्ध करून दिल्यास अधिकाधिक नागरिक पुढे येऊ शकतील.

ग्रामीण भागातील वाढत्या बेकायदेशीर सावकारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यस्तरावर विशेष मोहीम राबविण्याची मागणीही पुढे येत आहे. कायद्याचा धाक सर्वांसाठी समान असला पाहिजे आणि बेकायदेशीर सावकारी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई झाली तरच या वाढत्या समस्येला आळा बसू शकेल, असे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

## नीरा येथे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे पारंपरिक नीरास्नान; 'माऊली माऊली'च्या जयघोषात भक्तिमय सोहळा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

नीरा : प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे पारंपरिक नीरास्नान सोमवारी नीरा येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडले. हजारो वारकरी आणि भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात साजरा झाला.

पारंपरिक विधीनुसार माऊलींच्या पादुकांचे नीरास्नान करण्यात आले. त्यानंतर भाविकांना पादुकांचे स्पर्शदर्शन घेण्याची संधी मिळाली. 'माऊली माऊली'च्या अखंड जयघोषाने नीरानगरी दुमदुमून गेली. टाळ-मृदुंगाचा गजर, हरिनामाचा निनाद आणि अभंगांच्या सुरांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

पादुकांच्या स्पर्शदर्शनासाठी भाविकांनी शिस्तबद्ध रांगा लावत दर्शन घेतले. वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार पार पडलेल्या या सोहळ्याने भक्ती, श्रद्धा आणि समतेचा संदेश पुन्हा अधोरेखित केला.

नीरास्नान सोहळ्यानिमित्त प्रशासनाने सुरक्षा, वाहतूक आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधांची योग्य व्यवस्था केली होती.

संपूर्ण सोहळा शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# एआय शिवाय ऊस उत्पादनवाढ कठीण; एकरी १५० टनांचे लक्ष्य गाठण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आवश्यक – अशोक कडलक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च, पाण्याची टंचाई आणि शाश्वत शेतीची गरज लक्षात घेता ऊस शेतीत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर आता अपरिहार्य बनला आहे. मृदा, खत आणि पाणी व्यवस्थापनाचे शास्त्रीय नियोजन एआय च्या माध्यमातून केल्यास एकरी १५० टनांपर्यंत ऊस उत्पादनाचे लक्ष्य गाठणे शक्य होईल, असे प्रतिपादन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे कृत्रिम बुद्धिमत्ता व ऊस विकास शास्त्रज्ञ अशोक कडलक यांनी केले.

भीमाशंकर सहकारी साखर काएआयान्याच्या वतीने निरगुडसर येथील मेंगडेवाडी फाटा परिसरातील मोरया मंगल कार्यालयात आयोजित 'ऊस शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर व विकास मेळावा' या कार्यक्रमात ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत होते.

कडलक म्हणाले, बदलत्या हवामानाचा ऊस पिकावर मोठा परिणाम होत असून पारंपरिक शेतीपद्धतीत अनेकदा पाणी, खते आणि इतर निविष्ठांचा अनावश्यक वापर होतो. त्यामुळे उत्पादन खर्च वाढण्याबरोबरच जमिनीची सुपीकता आणि नैसर्गिक संसाधनांवरही ताण येतो. एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने मातीची गुणवत्ता, हवामानातील बदल, पिकाची वाढ, पाण्याची उपलब्धता आणि खतांची गरज यांचा अचूक अभ्यास करून योग्य वेळी योग्य निर्णय घेता येतो. यामुळे कमी खर्चात अधिक उत्पादन आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर शक्य होतो.

ऊस उत्पादन वाढविण्यासाठी अधिक पाणी किंवा अधिक खत देणे हा उपाय नसून, पिकाच्या गरजेनुसार योग्य प्रमाणात आणि योग्य वेळी निविष्ठांचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एआय आधारित प्रणालीमुळे शेतकऱ्यांना पिकाच्या प्रत्येक टप्प्यावर शास्त्रीय मार्गदर्शन मिळून उत्पादनाचा दर्जा आणि उत्पादकता वाढण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




यावेळी कृषी विज्ञान केंद्र, बारामतीचे अभिनंदन पाटील, आकाश वळकुंदे, परिमल गिरी, विजय आंग्रे, सुरेश मगडुम तसेच प्रगतशील महिला शेतकरी मनीषा निघोट यांनी आधुनिक ऊस लागवड, उत्पादन खर्चात बचत, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि उत्पादनवाढीच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात भीमाशंकर सहकारी साखर काएआयान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी काएआयान्याच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. एआय तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी प्रति शेतकरी सुमारे २५ हजार रुपयांचा खर्च वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट आणि भीमाशंकर सहकारी साखर काएआयाना संयुक्तपणे उचलणार आहेत. त्यापैकी १८ हजार २५० रुपये वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटकडून, तर ६ हजार ७५० रुपये काएआयान्याकडून अनुदान स्वरूपात दिले जाणार आहे. ही योजना ३ हजार शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असून आतापर्यंत २ हजार शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी लवकर नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बाळासाहेब घुले, पुष्पलता जाधव, बाबासाहेब खालकर, आनंदराव शिंदे, रामचंद्र ढोबळे, प्रिया वानखेडे, शांताराम बापू हिंगे, मच्छिंद्र गावडे, विलास लबडे, माऊली अस्वारे, सीताराम लोहोट, रमेश खिलारी, संजय गोरे, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे यांच्यासह शेतकी विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### बाबरी मशीद चौकशी आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एम. एस. लिबरहान यांचे निधन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड : प्रतिनिधी**

बाबरी मशीद पाडल्याप्रकरणी चौकशी करणाऱ्या आयोगाचे अध्यक्ष म्हणून देशभरात ओळख निर्माण करणारे निवृत्त न्यायमूर्ती एम. एस. लिबरहान यांचे वयाच्या ८७व्या वर्षी रविवारी, २ ऑगस्ट २०२६ रोजी चंदीगड येथे निधन झाले. सोमवारी, ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता कुटुंबीय, मित्र, सहकारी आणि वकिलांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

११ नोव्हेंबर १९३८ रोजी चंदीगडजवळील एका गावात जन्मलेल्या न्यायमूर्ती मनमोहन सिंह लिबरहान यांनी हरियाणातील अंबाला येथे वकिली व्यवसायाला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात वकिली करत न्यायक्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. पुढे ते पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाले. त्यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालय आणि मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणूनही जबाबदारी सांभाळली.

६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्याच्या घटनेनंतर केंद्र सरकारने १६ डिसेंबर १९९२ रोजी लिबरहान चौकशी आयोगाची स्थापना केली. न्यायमूर्ती लिबरहान यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाने तब्बल १७ वर्षे चौकशी केली आणि ३० जून २००९ रोजी अंतिम अहवाल सरकारकडे सादर केला. हा आयोग भारताच्या इतिहासातील सर्वाधिक काळ काम करणाऱ्या चौकशी आयोगांपैकी एक ठरला.

# ८३.३८ लाखांची भरपाई पण आयुष्याची किंमत किती? अपघातात उद्ध्वस्त झालेल्या बालपणावर सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पैशाने आयुष्य परत मिळू शकते का? हा प्रश्न पुन्हा एकदा देशासमोर उभा राहिला आहे. अपघातात आयुष्यभरासाठी पक्षाघातग्रस्त झालेल्या एका चिमुकल्याला सर्वोच्च न्यायालयाने ८३.३८ लाखांची भरपाई मंजूर करत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, अपघातातील भरपाई ही केवळ वैद्यकीय अपंगत्वाच्या टक्केवारीवर ठरवता येणार नाही; त्या जखमेचा व्यक्तीच्या संपूर्ण भविष्यातील जीवनावर आणि कमाईच्या क्षमतेवर होणारा परिणाम लक्षात घेतला पाहिजे.

न्यायमूर्ती उज्जल भुईयां आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, एखादे मूल अपघाताच्या वेळी कमावत नसले तरी त्याचे संपूर्ण भविष्य त्याच्यासमोर असते. त्यामुळे अशा बालकाला उत्पन्न नसलेली व्यक्ती म्हणून पाहणे ही अन्यायकारक भूमिका ठरेल. कायद्याने हरवलेल्या भविष्यास न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

हा निर्णय मानवी संवेदनांना स्पर्श करणारा असला, तरी एक कटू वास्तव समोर आणतो कोणत्याही भरपाईने एका मुलाचे हरवलेले बालपण, स्वप्ने, शिक्षण,



स्वावलंबन किंवा आयुष्यभराची शारीरिक वेदना परत मिळू शकत नाही.

भारतात दरवर्षी लाखो रस्ते अपघात होतात. अनेक कुटुंबे एका क्षणात उद्ध्वस्त होतात. काहींना आपल्या प्रिय व्यक्तींचा कायमचा विरह सहन करावा लागतो, तर काही जण आयुष्यभर अपंगत्वाचे ओझे वाहतात. न्यायालय आर्थिक मदत देऊ शकते, परंतु ती आयुष्याची किंमत ठरू शकत नाही.

या निर्णयातून एक मोठा संदेशही मिळतो अपघातातील भरपाई ही केवळ आकड्यांची गणिते नसून मानवी जीवनाच्या गुणवत्तेचा विचार करणारी असली पाहिजे. विशेषतः बालकांच्या प्रकरणात त्यांच्या शिक्षणाच्या, करिअरच्या, स्वप्नांच्या आणि सन्मानाने जगण्याच्या संधींचा विचार न्यायव्यवस्थेने करणे आवश्यक आहे. परंतु या निर्णयाइतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे अपघात रोखणे. निष्काळजी वाहनचालक, नियमांचे उल्लंघन, निकृष्ट रस्ते आणि कमकुवत अंमलबजावणी यामुळे निरपराध नागरिकांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. अपघातानंतर कोट्यवधींची भरपाई देण्यापेक्षा अपघातच होऊ नयेत, यासाठी कठोर उपाययोजना करणे ही सरकार, प्रशासन आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. भरपाई जखमेवरील आर्थिक मलम ठरू शकते; पण ती हरवलेले आयुष्य, हरवलेले बालपण आणि हरवलेले भविष्य कधीच परत आणू शकत नाही. म्हणूनच या निर्णयाकडे केवळ नुकसानभरपाई म्हणून नव्हे, तर प्रत्येक जीव अमूल्य असल्याची न्यायालयाने दिलेली ठाम आठवण म्हणून पाहिले पाहिजे.

## बृजभूषण निर्दोष पण लढा संपला नाही! विनेश फोगटचा एल्गार – 'सरकार संपूर्ण यंत्रणेसह त्यांच्याच पाठीशी उभे होते'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लैंगिक छळाच्या प्रकरणात माजी खासदार बृजभूषण शरण सिंह यांची न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता झाल्यानंतर महिला कुस्तीपटूंनी हा निर्णय उच्च न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. ऑलिम्पियन विनेश फोगट यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे स्पष्ट केले की, सर्व महिला कुस्तीपटूंनी आपल्या वकिलांना या निर्णयाविरोधात अपील दाखल करण्याच्या सूचना दिल्या असून, ही प्रक्रिया लवकरच सुरू होईल.

विनेश फोगट यांनी आपल्या पोस्टमध्ये सरकार आणि संपूर्ण यंत्रणेवर गंभीर आरोप करत म्हटले की, सरकार आणि संपूर्ण व्यवस्था बृजभूषण शरण सिंह यांना वाचवण्यासाठीच काम करत होती. त्यांनी पुढे ठामपणे सांगितले की, आम्ही आशा सोडलेली नाही. हा लढा अजून संपलेला नाही आणि न्याय मिळेपर्यंत महिला कुस्तीपटू संघर्ष सुरू ठेवतील.

या प्रकरणामुळे देशभरात पुन्हा एकदा महिला सुरक्षेचा प्रश्न, प्रभावशाली व्यक्तींवरील कारवाईची निष्पक्षता आणि न्यायव्यवस्थेवरील जनविश्वास यावर चर्चा सुरू झाली आहे. जंतर-मंतरवरील ऐतिहासिक आंदोलनापासून ते न्यायालयीन लढ्यापर्यंत पोहोचलेल्या या संघर्षाला आता नवे वळण मिळाले असून, महिला कुस्तीपटूंची पुढील कायदेशीर लढाई केंद्रस्थानी राहणार आहे.

दरम्यान, बृजभूषण शरण सिंह यांच्या निर्दोष मुक्ततेनंतर या प्रकरणावर राजकीय प्रतिक्रिया देखील तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता सर्वांचे लक्ष अपील प्रक्रियेकडे लागले असून, पुढील न्यायालयीन सुनावणीत या बहुचर्चित प्रकरणाची दिशा काय ठरणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष असेल.

## ई-२० पेट्रोलवर देशभर संताप? काँग्रेसचा मोदी सरकारवर हल्ला 'आकडे नाहीत, अहवाल नाहीत मग जनतेने विश्वास ठेवायचा कशावर?'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

देशभरात ई-२० पेट्रोलची अंमलबजावणी सुरू असताना या निर्णयावरून राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे. काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार टीका करत, ई-२० पेट्रोलच्या सुरक्षिततेबाबत सरकारकडे ठोस आकडेवारी, वैज्ञानिक अहवाल किंवा विश्वासार्ह अभ्यास नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे जनतेमध्ये असंतोष वाढत असून, सरकारकडून उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेची मागणी अधिक तीव्र होत असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सांगितले की, २९ जुलै





२०२६ रोजी संसदेत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेल्या उत्तरामुळे शंका दूर होण्याऐवजी आणखी अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकार ई-२० पेट्रोल पूर्णपणे सुरक्षित असल्याचा दावा करत असले, तरी त्या दाव्याला आधार देणारे पुरावे समोर ठेवले गेलेले नाहीत, असा आरोप त्यांनी केला.

काँग्रेसचा दावा आहे की, देशभरातील वाहनचालक, ग्राहक आणि तज्ज्ञांकडून ई-२० पेट्रोलचा वाहनांच्या इंजिनावर, इंधन कार्यक्षमतेवर आणि देखभाल खर्चावर होणाऱ्या परिणामांबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र, सरकारकडे या सर्व शंकांचे समाधान करणारी अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. दरम्यान, केंद्र सरकारने यापूर्वी ई-२० इंधनामुळे कच्च्या तेलावरील आयातीचे अवलंबित्व कमी होईल, पर्यावरणीय प्रदूषणात घट होईल आणि देशातील ऊस व जैवइंधन उद्योगाला चालना मिळेल, असा दावा केला आहे.


## ड्रोन हल्ल्यानंतर भारतीय नाविक बेपत्ता! सर्वोच्च न्यायालयाचे केंद्राला आदेश – 'राजनैतिक माध्यमे तातडीने वापरा'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काळ्या समुद्रात झालेल्या ड्रोन हल्ल्यानंतर बेपत्ता झालेल्या भारतीय नाविक दीपक कुमार गुप्ता यांच्या शोधासाठी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला तातडीने राजनैतिक पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आदेश दिले आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने उपलब्ध असलेल्या सर्व राजनैतिक माध्यमांचा वापर करून दीपक गुप्ता यांचा शोध घ्यावा, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले आहे.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने भारताचे महाधिवक्ता तुषार मेहता यांना युक्रेनमधील भारतीय दूतावास तसेच रोमानियाची राजधानी बुखारेस्ट येथील भारतीय दूतावासाशी तातडीने संपर्क साधून



दीपक कुमार गुप्ता यांचा ठावठिकाणा शोधण्याचे निर्देश दिले.

दीपक कुमार गुप्ता हे एम.व्ही. एजीएन रॅग्नार या मालवाहू जहाजावर कार्यरत होते. २५ जुलै २०२६ रोजी काळ्या समुद्रात या जहाजावर ड्रोन हल्ला झाला. त्यानंतर ते बेपत्ता झाले असून, त्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर त्यांच्या कुटुंबीयांनी केंद्र सरकारकडे मदतीची विनंती केली होती आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

या प्रकरणामुळे परदेशात कार्यरत भारतीय नाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. युद्धग्रस्त भागात अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सरकारची तयारी, तातडीची बचावयंत्रणा आणि राजनैतिक हस्तक्षेप किती प्रभावी आहे, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर केंद्र सरकार कोणती पावले उचलते आणि दीपक कुमार गुप्ता यांचा शोध किती लवकर लागतो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## 'अपयशाची भीती बाळगू नका':सिद्धार्थ जाधवचा तरुणाईला मंत्र, चिंचवडमधील 'दिलखुलास गप्पा' कार्यक्रमात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सुप्रसिद्ध मराठी अभिनेता सिद्धार्थ जाधवने तरुणाईला जीवनात अपयशाची भीती न बाळगता सकारात्मक विचारांनी प्रयत्नशील राहण्याचा सल्ला दिला. कोणतीही कृती पूर्ण क्षमतेने आणि समर्पण भावनेने केल्यास यश निश्चित मिळते, असे त्याने सांगितले.

चिंचवड येथे प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि दिशा सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सिद्धार्थ जाधवशी दिलखुलास गप्पा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे दीड तास चाललेल्या या कार्यक्रमात सिद्धार्थने विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली.

यावेळी बोलताना सिद्धार्थने स्वतःच्या दिसण्याबद्दल असलेल्या न्यूनगंडाचा उल्लेख केला. तो म्हणाला की, 'स्वतः मध्ये जे आहे ते प्रथम स्वीकारावे आणि स्वतःवर प्रेम करायला शिकले पाहिजे. माझा आरसा देखील मला प्रेरणा देतो.' स्वतःच्या क्षमता ओळखून कोणतीही कृती समर्पण भावनेने केल्यास ते सर्वोत्तमच ठरते, असे त्याने नमूद केले.

जाधवने पालकांबद्दलही महत्त्वाचा सल्ला दिला. 'जगात तुमचे आई-वडील हेच तुमचे 'बेस्ट फ्रेंड' आहेत. त्यांना कधीही 'इमोशनल ब्लॅकमेल' करू नका,' असे आवाहन त्याने केले. पालकांशी नेहमी आदरयुक्त संवाद ठेवण्याचे महत्त्व त्याने अधोरेखित केले. महाराष्ट्र शासनाने आपल्याला व्यसनमुक्तीचा 'ब्रँड अँबेसिडर' केले, हा आपल्या आई-वडिलांच्या संस्कारांचा सन्मान असल्याचे त्याने सांगितले.

सर्वच क्षेत्रात अपयश येते, परंतु ते कायमस्वरूपी नसते. त्यातून निराश न होता दारू, सिगारेटसारख्या व्यसनांपासून दूर राहावे आणि नैराश्यात कधीही आत्महत्येचा विचार करू नये, असेही सिद्धार्थने स्पष्ट केले. रूप आणि सौंदर्य नश्वर असून, आपल्या कर्तृत्वातून आपले वलय निर्माण करावे, यावर त्याने भर दिला. 'मला एफटीआयआय किंवा ललित कला केंद्रात प्रवेश मिळाला नाही. मला द्रोणाचार्य मिळाले नाहीत. मात्र, मी अनुभवाच्या जोरावर एकलव्य होऊ शकलो,' अशा भावना त्याने व्यक्त केल्या. यावेळी प्रतिभा इन्स्टिट्यूटचे संस्थापक सचिव दीपक शहा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वनिता कुऱ्हाडे, दिशा सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर यांच्यासह राजेंद्र करपे, गोरख भालेकर, सचिन साठे, नाना शिवले, संतोष बाबर, अविनाश ववले, नंदकुमार कांबळे आणि संतोष चांदेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पंतप्रधान मोदींच्या स्वप्नावर तुकाराम मुंढेंचे विधान चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ मध्ये भारताला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहिले आहे. विकसित भारताची संकल्पनाही त्यांनी अनेकदा आपल्या भाषणातून जाहीर केली. मात्र, आपल्या रोखठोक वक्तव्यासाठी आणि प्रशासकीय कामासाठी प्रसिद्ध असलेले राज्याचे वरिष्ठ सनदी अधिकारी तथा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यावर आपले मत व्यक्त करताना एक महत्त्वाचा सल्ला दिला. त्यामुळे २०४७ च्या भारतावर मुंढेंची प्रतिक्रिया हा चर्चेचा विषय झाला आहे.

समाजाचा प्रत्येक प्रवाह किंवा बहुसंख्यांचा निर्णय योग्यच असेल असे नाही. समाजहित आणि नैतिकतेच्या विरोधात जाणाऱ्या प्रवृत्तींना विरोध करण्याचे धैर्य प्रत्येकामध्ये असले पाहिजे. झुंडशाहीविरोधात संघर्ष करण्याची क्षमता आणि विवेक जोपासणे ही काळाची गरज असून ही जबाबदारी आता नवीन पिढीने स्वीकारली पाहिजे, असे तुकाराम मुंढे म्हणाले. स्मृतीशेष मधुकरराव तामगाडगे ट्रस्टच्या वतीने वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित शिष्यवृत्ती वितरण व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

आजच्या काळात शस्त्रांचे नव्हे, तर विचारांचे युद्ध सुरू असल्याचे नमूद करत मुंढे यांनी समाजमाध्यमांद्वारे चुकीची माहिती पसरवून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होत असल्याचा इशारा दिला. प्रवाहाबरोबर वाहत जाण्यापेक्षा योग्य दिशेची निवड करण्याची क्षमता विकसित करणे, हीच आजच्या शिक्षणाची खरी कसोटी आहे. समाजाचा प्रवाह चुकीचा वाटत असेल, तर त्याविरोधात उभे राहण्याची मानसिक तयारी आणि नैतिक धैर्य व्यक्तीमध्ये असले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

# इराण युद्धाचा भारतालाही फटका? उत्पादन क्षेत्रावर मंदीचे सावट; मागणी घटली, खर्च वाढला, उद्योगांसमोर नवे संकट!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

मध्य पूर्वेतील इराण युद्ध पाचव्या महिन्यात पोहोचत असताना त्याचे परिणाम आता जागतिक उत्पादन क्षेत्रावर स्पष्टपणे दिसू लागले आहेत. वाढते ऊर्जा दर, कच्च्या मालाच्या वाहतुकीतील अडथळे आणि जागतिक मागणीत झालेली घट यामुळे अनेक देशांतील कारखाने दबावाखाली आले आहेत. या जागतिक घडामोडींचा परिणाम भारताच्या उत्पादन क्षेत्रावरही होण्याची शक्यता वाढली असून, निर्यात, उत्पादन खर्च आणि औद्योगिक वाढीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

जुलै २०२६ मधील जागतिक उद्योग सर्वेक्षणानुसार, चीनमधील नवीन ऑर्डरची वाढ जानेवारीनंतरच्या सर्वात नीचांकी पातळीवर पोहोचली. जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेत मागणी कमी झाल्याने उत्पादन क्षेत्रावर दबाव वाढला आहे. युरो क्षेत्रात उत्पादन निर्देशांक ५१.४ वरून ५१.९ पर्यंत वाढला असला, तरी ही वाढ नवीन मागणीमुळे नसून प्रलंबित ऑर्डर पूर्ण केल्यामुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या परिस्थितीमागे सर्वात मोठे कारण म्हणजे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतुकीवर झालेला गंभीर परिणाम. ही सामुद्रधुनी आखाती देशांतील तेल आणि नैसर्गिक वायू निर्यातीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. युद्धामुळे जहाजवाहतुकीत अडथळे निर्माण झाल्याने ऊर्जा दर झपाट्याने वाढले आणि त्याचा थेट परिणाम उत्पादन खर्चावर झाला आहे.

भारतासाठी ही परिस्थिती अधिक संवेदनशील ठरू शकते. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी मोठा हिस्सा आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेल महाग झाल्यास उत्पादन खर्च वाढणे, वाहतूक महाग होणे, निर्यातदारांवरील दबाव वाढणे आणि शेवटी ग्राहकांवर महागाईचा भार पडण्याची शक्यता आहे.

यापूर्वी जाहीर झालेल्या उद्योग निर्देशांकानुसार, भारताच्या उत्पादन क्षेत्राची वाढ जवळपास पाच वर्षांतील



सर्वात मंद गतीने झाली आहे. यावरून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मागणी दोन्ही कमकुवत असल्याचे संकेत मिळत आहेत. अशा परिस्थितीत जागतिक मंदीची छाया भारतीय उद्योगांवर अधिक गडद होऊ शकते.

दरम्यान, जर्मनीमध्ये उत्पादन क्षेत्राने तिसऱ्या तिमाहीची चांगली सुरुवात केली असली तरी मध्य पूर्वेतील संघर्ष कायम राहिल्यास ही वाढ टिकवणे कठीण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. फ्रान्समध्ये उत्पादन क्षेत्र पुन्हा संकुचनात गेले, इटलीमध्ये वाढीचा वेग कमी झाला, तर ब्रिटनमध्ये सलग नवव्या महिन्यात वाढ झाली असली तरी ती चार महिन्यांतील सर्वात कमी होती.

याउलट जपानमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील वाढत्या मागणीमुळे उत्पादनात १२ वर्षांतील सर्वात वेगवान वाढ नोंदवली गेली. त्यामुळे जागतिक उत्पादन क्षेत्रात चित्र मिश्र स्वरूपाचे असले तरी युद्ध, ऊर्जा संकट आणि कमकुवत मागणी या तीन घटकांनी जागतिक उद्योगांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

भारतातील उद्योग, निर्यातदार आणि धोरणकर्त्यांसाठी हा इशारा महत्त्वाचा मानला जात आहे. जर इराण युद्ध दीर्घकाळ सुरू राहिले आणि तेलाच्या किमती आणखी वाढल्या, तर भारतीय उत्पादन क्षेत्रावर त्याचा परिणाम अधिक तीव्र होऊ शकतो. त्यामुळे आगामी काही महिने भारतीय अर्थव्यवस्था आणि उद्योग क्षेत्रासाठी निर्णायक ठरणार आहेत.